**निशाणी क्रमांक ३०**

सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक कथन करतो की,

नाव : **संगिता आनंदराव लाटे,**

वय : ४३ वर्ष,

व्यवसाय : शेती

राहणार : ढेकरी ता. तुळजापुर जि. धाराशिव.

**सरकारतर्फे सरकारी वकील श्रीमती. टि. बी. वैद्य यांच्या मार्फत**

**सरतपास–**

१. घटना २०१८ साली आमच्या शेतात संध्याकाळी ०५.३० च्या सुमारास घडली. त्यावेळी मी शेतात काम करीत असताना तेथे आरोपी मारुती लाटे आणि रामेश्वर लाटे हे आले. तेंव्हा आरोपींनी मला शिवीगाळ केली. आरोपी रामेश्वर लाटे याने मला लाकडाने माझ्या डोक्यात, पाठीत मारले. त्यामुळे मी बेशुध्द झाले. मला दवाखान्यात आणले होते. दुस–या दिवशी मी घटनेबाबत पोलिसांना फिर्याद दिली. मला आता अभिलेखावरील फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा निशाणी अंगठा आहे. फिर्यादला **निशाणी क्रमांक ३१** देण्यात येते. आरोपी आज न्यायालयात हजर नाहीत. आरोपींना पाहील्यास मी ओळखू शकते. आरोपी रामेश्वरने मला ज्या लाकडाने मारले होते ते लाकूड दाखविल्यास मी ओळखू शकते. मला आता जी. एम. आर. क्रमांक ०२/२०२३ वरील लाकडी काठी दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यास **आर्टिकल 'अ'** देण्यात येते.

नियमित फौ.खटला क्रं.२१३/२०१८

शासन वि. मारुती

**निशाणी क्रमांक ३०**

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी व त्यांच्या विधिज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर.त्यामुळे उलटतपास नाही.**

दिनांक:– ०८/०१/२०२६.

श्रवणोत्तर स्वीकृत

VIVEK VITHALRAO NIVGHEKAR

Digitally signed by VIVEK VITHALRAO NIVGHEKAR
Date: 2026.01.12 15:11:01 +0530

(व्ही. व्ही. निवघेकर)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग तुळजापूर